<u>नियमित दिवाणी दावा नं. ९१/१५</u>

<u>**निशाणी ५५ लगत आदेश**</u> :

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र ३ यांनी त्यांचेविरुद्धचा एकतर्फा आदेश रद्द करण्यासाठी दाखल केला आहे. प्रतिवादीच्या कथनानुसार त्यांचे वडील दिनांक २५/१०/२०१४ रोजी मयत झाल्यामुळे प्रतिवादींचे कुटुंब दुःखामध्ये होते. याशिवाय प्रतिवादी व्यवसायानिमित्त वेगवेगळ्या ठिकाणी असतात त्यामुळे सदर दाव्याच्या कामी कामकाज पहाणे शक्य झाले नाही. त्यामुळे प्रतिवादी विरुद्धचा एकतर्फा आदेश रद्द करावा.

२. सदरच्या अर्जावर वादी यांनी निशाणी ५९ कडे आपले म्हणणे दिले आहे व अर्जातील कथन अमान्य केले आहे. वादींच्या कथनानुसार एकतर्फा आदेश झाल्यापासुन प्रतिवादी कोर्टासमोर कधीही आले नाहीत. वादी व प्रतिवादी यांचा रे.दि.मु.नं. ६०/११ न्यायप्रविष्ठ असुन सदर दाव्याचे कामी प्रतिवादी यांचे पुर्वहक्कदार वकिलपत्र दाखल करुन म्हणणे देऊन पुर्वीच हजर झालेले आहेत. तसेच त्या दाव्याच्या कामी प्रतिवादी दिनांक ०६/१२/२०१७ रोजी हजर झालेले आहेत. दावा अंतिम युक्तिवाद कामी नेमलेनंतर प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. प्रस्तुत कामातील नोटीसीची बजावणी प्रतिवादींना झालेली आहे. त्यामुळे या सर्व कारणास्तव प्रतिवादींचा अर्ज नामंजुर करावा.

३. सदर अर्जावर दोन्ही वकिलांचा युक्तिवाद ऐकला. दाव्याचे अवलोकन केले असता वादी यांनी दिनांक २४/०८/२०१७ रोजी सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. प्रतिवादी यांचे विरुद्ध दिनांक २५/१०/२०१४ रोजी एकतर्फा आदेश झाल्याचे कबुल केले आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यास झालेला विलंब लक्षात घेता २ वर्षापेक्षा जास्त कालावधी झाल्याचे दिसुन येते. झालेला विलंब लक्षात घेता प्रतिवादी यांनी अर्जामध्ये नमुद केलेले कारण समाधानकारक नाही. यावरुन प्रतिवादी यांनी हेतुपुरस्सर विलंब केल्याचे स्पष्ट होते. प्रस्तूतचा दावा

गुणदोषांवर निकाली काढण्यासाठी दोन्ही पक्षकारांना संधी देणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रक्रियात्मक विलंब टाळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज मंजुर करणे न्यायाच्या दृष्टीने योग्य आहे. प्रतिवादी यांनी केलेल्या विलंबासाठी त्यांचेवर खर्च ठेवणे योग्य वाटते. दोन्ही पक्षकारांमधील भविष्यातील गुंतागुंत टाळण्यासाठी व दाव्याचा निर्णय गुणदोषावर करण्यासाठी अर्ज मंजुर करणे आवश्यक आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश करण्यात येतो.

## आदेश

अर्ज रक्कम रु. १५००/- च्या खर्चावर मंजुर करण्यात येतो. खर्चाची रक्कम वादी यांना देण्यात यावी.

सही/-

(सौ. एस. के. देशमुख)

दिनांक : १६/०३/२०१८

५ वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
इस्लामपूर.